साद देते पर्यावरण
आगामी उपक्रम

- **छोटे दोस्त मिटिंग:** अधिक माहिती wapp ग्रुपवर/प्रत्यक्ष पाठवण्यात येईल. आपल्या व शेजाऱ्यांच्या मुलामुलींना या मिटिंगला पाठवायला विसरू नका.

➢पर्यावरण स्नेही गणेशोत्सव स्पर्धा :

तुम्हाला यासाठी वेगळे नाव देण्याची गरज नाही. १. तुम्ही सर्वोदय नगर मध्ये राहता २. तुमच्या घरी गणेशोत्सव असतो. या दोन गोष्टी आहेत म्हणजे तुम्ही या स्पर्धेत आहात (by default). पर्यावरण मित्रचे प्रशिक्षित परीक्षक तुमच्या घरी येतील. आम्हाला खात्री आहे की आमच्या परीक्षकांची तुमच्या घरी होणारी व्हिजिट तुम्ही नक्की एन्जॉय कराल.

[अधिक माहिती या अंका सोबतच्या पत्रिकेत]

➢माझ्या स्वप्नातील सर्वोदय नगर :

स्वप्ने पहा आणि ती सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा. असे थोर थोर विचारवंतांनी म्हटले आहे. त्या शिवाय आम्ही देखील म्हटले आहे.

कसे असेल तुमच्या स्वप्नातील सर्वोदय नगर? उकिरडा की नंदनवन? आम्हाला उत्सुकता आहे जाणून घेण्याची, तुमच्या स्वप्नातील सर्वोदय नगर. आम्हाला पाठवा:

निबंध/ कविता/ चित्र/ पोस्टर.
निबंध शब्द मर्यादा २०० ते ५०० शब्द.
कविता: २ ते ५ कडवी
चित्राचा आकार प्रकार रंग: तुमची आवड
पोस्टरचा आकार: तुम्ही ठरवाल तो.
वयोगट: खुला.
भाषा: मराठी/ हिंदी/ English
बक्षिसे: भरपूर
आम्हाला स्वप्ने पाठवा १५ सप्टें. पर्यंत.
तुमचे नाव, वय, पत्ता आणि मोबाईल नं. लिहायला विसरू नका.

- दर आठवड्याच्या मिटिंगला यायला विसरू नका. या वेळी आपण खालील उपक्रमांवर चर्चा व आखणी करणार आहोत. ॲग्रो टूर, टेरेस फार्मिंग, टेरेस गार्डन, व्हर्टिकल गार्डन, बोन्साय इ.

➢ह्या ग्रुप च्या Whtsapp ग्रुप मध्ये कोणाला सहभागी व्हायचे असेल तर त्यांनी ९९६७०२४२३७, ९९३०१७०५८० ह्या नंबर्स वर संपर्क करावा

कविता -
चलो मिलकर आज एक कदम बढ़ाये
कदम के साथ साथ हात भी चलाये
खायी हमने कसम करके अपने हौसले बुलंद
मिटा देंगे हम गंदगी..अस्वछता का आलम
चल रही है एक धुन और एकही गान
आओ मिलकर चलाये हम स्वच्छ भारत अभियान ||
छट गया अँधेरा निकल आई आशा की किरण
युग परिवर्तन का हो रहा है आरंभ
उठालो अपने अपने सफाई के हथियार
हटादो कूड़ा कचरा और मन में दबा आलस्य
राष्ट्र विकास मे सहयोग देनेकी सबको है आन
आओ मिलकर चलाये हम स्वच्छ भारत अभियान ||
अब जाग रहा है हर एक गाव और हर एक शहर
बढ़ रही है उमंग और स्वच्छता की लहर
सबको है कंधे से कंधा मिलाना
स्वच्छता के लिए अवजार है चलाना
अब भारत को हासिल करना है विश्व मे सम्मान
आओ मिलकर चलाये हम स्वच्छ भारत अभियान ||
चारो दिशा मे अब गूंज उठी एक ललकारी
नवनिर्माण की हर गांव और हर शहर की बारी
सब मिलके उठाओ हात करो प्रतिज्ञा एक साथ
बन के स्वच्छता के दूत, करेंगे अस्वच्छता पे मात
क्योंकी अब बढानी है देश की शान
आओ मिलकर चलाये हम स्वच्छ भारत अभियान |

पर्यावरण

जरूरी आहे या आधुनिक जगात
करण्या निसर्गाचे संरक्षण,
जिव्हाळ्याचा विषय आहे
कसे वाचवूया पर्यावरण.
हळूहळू आवळतो आहे सारीकडे
प्रदूषणाचा विळखा,
आरोग्यास हानीकारक
वेळीच धोके ओळखा.
प्लास्टिकचा अतिवापर
करतोय -हास निसर्गाचा,
आधुनिकतेच्या हव्यासापायी
जीव धोक्यात सजीवांचा.

व्यवस्थापन वेळीच नाही केलं तर
वाढतील डोंगर कच-याचे,
ओला सुका कचरा वर्गीकरण
आरोग्य सांभाळू सर्वांचे.
ओल्या कच-याची करून खतनिर्मिती
ढीग कमी करू कच-याचे,
सुक्या कच-यावर करून पुनःप्रक्रिया
हीत साधू सकळांचे.
हवे थोडे प्रयत्न नि
सर्वात महत्त्वाची इच्छाशक्ती,
कचरा व्यवस्थापनाने साधू
सर्व प्रदूषणांपासून मुक्ती.

सवयी पटकन बदलंत नाहीत
आहे आम्हाला कबूल,
निसर्ग देतोय दोहोकरांनी
म्हणून करावे किती वसूल ?
कचरा विल्हेवाटीकडे जर केले दुर्लक्ष
तर जाणवतील त्याचे अपाय,
थोडे नियोजन, थोडे प्रशिक्षण
चर्चा, क्रूतीतून उमगतील उपाय.
एकजूट नि साथ हवी सर्वांची
लढण्या सामाजिक प्रश्नावर,
निसर्गाला सांभाळले सर्वतोपरी
क्रूपाद्रूष्टी होईल आपल्यावर!

- संगीता हिर्लेकर

SARVODAY NAGAR ECO FRIENDS : Members working for this monthly booklet:
Dr. Sanjeevani Kulkarni
Mrs. Sangeeta Hirlekar
Mr. Prakash Mahadik
Mr. Ishwar Patil
Mrs. Varsha Kulkarni
Mrs. Asmita Abhyankar
Mrs. Shilpa Raje
Mrs. Aarti Patil
Mr. Nandkumar Palkar
Mr. Kaushik Inamdar

ECO FRIENDS पर्यावरण मित्र
SARVODAY NAGAR ECO FRIENDS Subscription 01 AUGUST2019 सर्वोदय नगर पर्यावरण मित्र

दृष्टिकोन

- निसर्गाप्रति/पर्यावरणाप्रति जन सामान्यांचा सकारात्मक दृष्टिकोन जोपासला जावा आणि स्वच्छतेचा आग्रह सर्वत्र धरला जावा तसेच कचरा त्याची विल्हेवाट योग्य मार्गाने केलीजावी ज्यामुळे जल, वायू आणि जमिनीवरील प्रदूषणापासून पृथ्वीचे संरक्षण व्हावे.

मिशन / कार्यप्रणाली

- पर्यावरणाप्रति जागरूक राहण्यासाठी जनजागृती, कायमस्वरूपी विचारसरणी व उपाय यां द्वारे शहरातील स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी आग्रही.

उद्देश

- 1. जनजागृती कार्यशाळांद्वारे स्वच्छतेप्रति जागृती करणे.
- 2. पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करून कायमस्वरूपी चांगल्या सवयी रुजवणे, ज्याने पर्यावरणाची हानी न करण्याबद्दल नागरिकांमध्ये सद्भावना निर्माण करणे.
- 3. शहर स्वच्छते समंधीत सरकारी नियमांचे योग्य प्रकारे पालन करण्यासमंधीत आग्रही राहणे.

उपक्रम

सीड बॉल तयार करण्याची कार्यशाळा : भाऊकाका उद्यानात सीड बॉल तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात अली. त्यात लहान-थोर असे ३५-४० जण उस्फुर्तपणे सहभागी झाले आणि आकर्षक सीड बॉल बनवले.

वृक्षारोपण :४ ऑगस्ट ला सकाळी ७-८.३० च्या दरम्यान भर पावसात सर्वोदय नगरात वृक्षारोपण करण्यात आले. नवीन सक्रिय सदस्यांना सीड बॉल्स देऊन गौरवण्यात आले.

प्लास्टिकचे उच्चाटन : महिनाभर घरातील प्लास्टिक गोळा करून ऊर्जा फौंडेशन या संस्थेला दिले जाते.

पॅड नष्ट करण्याचे प्रात्यक्षिक : पर्यावरण पूरक पॅड नष्ट करणाऱ्या पात्राचे याचे काम कसे चालते याचे प्रात्यक्षिक महिलांना देण्यात आले.

सभा: सर्वोदय नगर स्वच्छतेचे प्रतीक बनवण्याचा उद्देशाने प्रेरित पर्यावरण मित्र यांची दर शनिवारी ९. ३० वाजता सभा घेतली जाते.

संपादकीय

सर्वोदय नगर (पाथर्ली रोड, डोंबिवली पूर्व) चा 'पर्यावरण मित्र' चा पहिला वहिला अंक आज (दि. १५ ऑगस्ट. २०१९) तुमच्या समोर सादर करताना आम्हाला आनंद होत आहे, छे! असे टिपिकल वाक्य नकोय इथे.
कुणी नाही इथे तुम्ही नि आम्ही. तर आहोत आपण!
'पर्यावरण मित्र' भेटलाय आपल्याला, सर्वोदय नगर वासियांना, नगर वासियां साठी, नगर वासियांचा मित्र! So, आपण नुसते नाही तर very very happpy आहोत !!

कशी झाली सुरुवात?
व्यक्तिगत पातळी:
आपल्यापैकी काही जण काही गोष्टी व्यक्तिगत पातळीवर पूर्वीपासून करीतच होते. कुणाचं ओल्या कचऱ्याचं कंपोस्ट, कुणाचं झीरो गारबेज, कुणाचं प्लास्टिक सेग्रिगेशन, कुणी नियमितपणे 'ऊर्जा' लाच प्लास्टिक देणारे, कुणी झाडं लावतंय, लावलेल्या झाडांची वर्षभर निगा, दोघी-चौघी एकत्र जमून ओल्या कचऱ्याचं युनिट बघून आल्या....
समविचारी रहिवासींची एकत्रित घालमेल:
गप्पा- चर्चा-गाठीभेटी- wapp- विचारांचे नि कृतींचे आदान प्रदान. एक गोष्ट सगळ्यांनाच लक्षात आली, वीज पडून लख्ख प्रकाश पडावा तशी, ती ही की, सर्व नगर वासियांनी एकत्रित येऊन काही ठोस पावले उचलली तर! अहाहा !!

SDA
(ये SDA क्या होता है भाई?)
स्वच्छ डोंबिवली अभियान
अहो, स्वच्छ डोंबिवली अभियान. डोंबिवली आणि स्वच्छ? ये हो सकता है क्या? हो सकता है भाई जरुर ! पयले सर्वोदय नगर तो हम अपने लेवलपे स्वच्छ रखेंगे ।
काय आहे स्वच्छ डोंबिवली अभियान? वाचा याच अंकात.

सर्वोदय नगर पातळीवर चालना:
स्वच्छ डोंबिवली अभियानने इथल्या सर्वोदय हाइट्स मधे, भाऊ काका उद्यान मधे, presentations दिली.
श्री नंदकुमार पालकर यांनी घेतलेल्या सभांमधून त्यांचे विचार, सखोल अभ्यास, कामाची तळमळ बघून त्यांनी मांडलेल्या मुद्यांवर विचार नि कृती व्हावी अशी भावना सर्वांच्या मनात बळावली. आणि सर्व जण त्यांच्या खांद्याला खांदा लावून या मिशन मधे उतरले. नगर वासियांची घालमेल संपून एकत्रित रीत्या 'काही करुच' हे नक्की ठरले. wapp group तयार झाला. दर आठवड्याची मिटिंग चालू झाली.
प्रत्यक्ष कृती: आपण प्रत्येक घरामधून खालील गोष्टी सुरु केल्या. आपण
ओला कचरा वेगळा देतो (सोमवार ते शनिवार दर दिवशी)
सुका कचरा वेगळा देतो (रविवारी)
प्लास्टिक वेगळे देतो (ऊर्जा फाउंडेशनने ठरवलेल्या तारखेला)
आपण केलेल्या विनंती प्रमाणे ऊर्जा व केडीएमसी मिळून गाडी पाठवतात, नगर मधून प्लास्टीक घेऊन जाण्यासाठी.
मेटल वेस्ट, ग्लास वेस्ट वेगवेगळे ठेऊन भंगार वाल्याला देतो
इ-वेस्ट ड्राइव्ह पर्यंत वेगळे ठेवतो
अहो शुक शुक, वाचताय ना, करताय ना हे सगळं तुम्ही पण? नसाल करत तर होऊन जाऊ दे सुरुवात लगेच. अजून उशीर नका करु.

अजून काही प्रत्यक्ष कृती:
गेल्या काही आठवड्यात आपण काही उपक्रम घेतले, जसे की, सीड बॉल ट्रेनिंग, नगर परिसरात वृक्षारोपण आणि पर्यावरण मित्र चा हा पहिला अंक आपले आगामी उपक्रम याच अंकात पुढील पानावर पहा.

पर्यावरण मित्र:
हा मित्र आपल्याला भेटेल दर महिन्याला नवीन गप्पा गोष्टींसह.
यात असतील गोष्टी 'करून दाखवले', 'साद देते पर्यावरण- आगामी उपक्रम', (वाचकांचा) प्रतिसाद, वाचा आणि विचार करा, हे कराच, आपण यांना ओळखता का?, आकडेवारी आणि बरंच काही....
ही नाही 'बोलाचिच कढी आणि बोलाचाच भात'. तर हेआहे पत्र आणि मित्र. आपल्या प्रत्यक्ष कृतींचा आरसा. आपला सेल्फी. चला तर मग, यात छान छान छापण्यासाठी, आधी त्या छान गोष्टी करूया. मग काय, वाटतंय ना तुम्हाला पण माझ्या सारखंच?

-Dr. संजीवनी कुलकर्णी (संपादक)

स्वच्छ डोंबिवली अभियान

विवेकानंद सेवा मंडळ, डोंबिवली या संस्थेतील तरुण कार्यकर्ते तसेच काही डोंबिवलीतील नागरिक यांनी पुढाकार घेऊन एप्रिल २०१८ रोजी स्वच्छ डोंबिवली अभियानाची सुरुवात केली. या मध्ये सुरुवातीला रस्ते व परिसर स्वच्छता या उपक्रमाद्वारे नागरिकांमध्ये आपले शहर स्वछ ठेवण्या बद्दलचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले. मागील वर्षीच्या पावसाळ्यात सुमारे ३७५ वृक्षारोपण करण्यात आले. डोंबिवलीकर नागरिकांमध्ये कचरा व स्वच्छते संबंधीत योग्यती जागरूकता नसल्याने अभियानाचा रोख पूर्णपणे जनजागृती (Public Awareness) कडे वळविण्यात आला. यामध्ये अभियानातील कार्यकर्ते डोंबिवलीत सर्व सोसायट्या, मंदिरे, ट्रस्ट, शाळा, कॉलेज, संस्था यांच्याकडे कार्यशाळा अथवा चर्चा करण्यासाठी विनंती पत्र देऊ लागले, तसेच या सर्व संस्था, सोसायट्या यांकडून प्रतिसाद ही मिळू लागला.
दार शनिवारी आणि रविवारी त्यांच्या वेळा ठरवून कार्यशाळांचे आयोजन सुरू झाले. आज पर्यंत १०० हुन अधिक कार्यशाळा आणि ६००० हुन अधिक लोकं सहभागी झाले. हे काम आज ही दर शनिवारी आणि रविवारी चालू आहे.
या कार्यशाळां बरोबर भंगरवाला संमेलन, ३१ प्राथमिक शाळांच्या शिक्षकांचे संमेलन घेण्यात आले. यापुढे कचरा वेचकांचे संमेलन, भंगरवाल्यांचे followup session, सफाई कामगार आणि अधिकारी (KDMC) यांचे संमेलन,महाविद्यालयीन शिक्षकांचे संमेलन, नगरसेवकांचे संमेलन इत्यादी व अनेक उपक्रम घेण्यात येणार आहेत.
हे सर्व आपल्या शहरासाठी आणि ओघाने स्वच्छ भारत मोहिमेत खारीचा वाटा उचलण्याच्या दृष्टिकोनातून चालू आहे. यातील सर्व कार्यकर्ते कोणताही आर्थिक लाभ, प्रसिद्धी, बक्षिसाच्या अपेक्षेने काम करीत नाही याची कृपया नोंद घ्यावी. झाल्यास आपण सर्व आपआपल्या आचरणाने, कार्याने, जागरूकतेने या स्वच्छतेच्या अभियानात सामील व्हावे ही विनंती!

ओला कचरा-सुका कचरा म्हणजे काय रे भाऊ!
ओला कचरा
जो कचरा बायोडिग्रेडेबल म्हणजे नैसर्गिक रित्या नाश पावतो त्या कचऱ्याला आपण ओला कचरा म्हणतो. यामध्ये प्रामुख्याने अन्न पदार्थ, फळे, भाज्या, मांस, मासे, हाडे, चहा कॉफी चा गाळ, निर्माल्य इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

सुका कचरा
जो कचरा बायोडिग्रेडेबल नाही, नैसर्गिकरित्या नाश पावत नाही, उलट त्याचा पर्यावरणात राहिल्यास पर्यावरणासाठी धोका निर्माण होतो त्याला सुका कचरा म्हणतो. या मध्ये थर्माकोल, प्लास्टिक, मेटल, पेपर, काचा, इलेक्ट्रॉनिक्स वेस्ट, औषध, स्त्रिया आणि लहानमुलांचे प्याड, डायपर्स इत्यादींचा समावेश होतो.


ओला कचरा म्हणजे...
स्वयंपाक घरातील खरकटे अथवा शिळे अन्न, कुजकी फळे-पालेभाज्या, अंड्याची टरफले, भाज्यांच्या साली व देठ, चहा पावडर, मासे, मांस, हाडे, केसांची गुंतवळ, कापलेली नखे, झाडांचा पालापाचोळा, नासलेले पदार्थ, नारळाच्या करवंट्या, शहाळी वगैरे. निसर्गात जे-जे विघटनाद्वारे नष्ट होते, ते सारे म्हणजे ओला कचरा.

सुका कचरा म्हणजे...
पॉलिथिनच्या पिशव्या, प्लॅस्टिकच्या वस्तू, थर्माकोलचे तुकडे, लोखंडी वस्तू (तारा, खिळे, ब्लेड वगैरे), फुटक्या कपबशा व काचेचे ग्लास, विजेचे बल्ब व ट्यूबच्या काचा, फाटलेले कपडे, रबर, कागदी बॉक्स यांसारख्या वस्तू, वर्तमानपत्रांची रद्दी, पुठ्ठा, कागद-कचपट, पायाने आलेली माती-धूळ आदी.

वरील दोन्ही प्रकारचा कचरा आपण ध्यानात घ्यावा आणि आज पासून जे जे आचरण कराल त्यात कोणता कचरा आहे तो कचरा कोणत्या प्रकारात येतो याबद्दल संशोधक वृत्ती आणि दृष्टींकोनातून पाहावे. त्यामुळे आपला कचरा करण्याचा किंवा त्यावर आळा कसा बसेल यावर विचार सुरू होईल. पुढील अंकात आपण या दोन्ही प्रकारच्या काचाऱ्याची विल्हेवाट पर्यावरणाला क्षती न पोचता कसे करता येईल या बद्दल माहिती देऊ!
धन्यवाद!

कचरा व्यवस्थापन आणि भंगारवाले सहभाग

सुक्या कचऱ्याच्या विल्हेवाटीचे अनेक मार्ग आहेत. एक मार्ग आपल्या जवळ आहे, तो म्हणजे आपल्या अवती भोवती, प्रत्येक गल्ली-बोळात असलेले भंगारवाल्यांचं जाळं. डोंबिवली शहरात या सर्व भंगारवाले बांधवांचं एकत्रीकरण, एक सम्मेलन आयोजित करण्यात आले. या बांधावंकडून असे जाणवले कि त्यांच्याकडे सर्व गोष्टींचे उत्तर कमी अधिक प्रमाणात आहे. मुख्य म्हणजे त्यांचे एक जाळे (Network) आहे. या त्यांच्या साखळीचा उपयोग अनेक संस्था, कारखाने, पुनर्चक्रण (Recyclers) इत्यादी करू शकतात आणि योग्य मोबदला त्यांच्या या देशसेवेच्या कार्या बद्दल देऊ शकतात. जर हि यंत्रणा हि समाजव्यवस्था याकडे नीट लक्ष दिलं गेलं तर कचऱ्याचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी लक्षणीय उत्तरे मिळतील. संपूर्ण सुका कचरा वर्गीकरण करून एकमार्गी मिळण्याचे जाळे विकसित होईल आणि कोणताही कचरा डम्पिंग ग्राउंडची भर होणार नाही.
- नंदकुमार पालकर, nkpalkar@gmail.com